पुढारी

# डॉ. दीपक पाटील : रुग्णांना संजीवनी देणारे व्यक्तिमत्त्व

**कोडोली : पुढारी वृत्तसेवा**

वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर पैसे कमविण्याकरिता शहरात जाण्या ऐवजी सामाजिक बांधिलकी व ग्रामीण भागातील रुग्णांची सेवा करण्याचा ध्यास घेतलेल्या डॉ. दीपक पाटील यांनी कोडोली व बोरपाडळे यासारख्या डोंगरी व ग्रामीण भागात हॉस्पिटल उभारून सुरू केलेली रुग्ण सेवा ही निश्चितच कौतुकास पार ठरली आहे. 'रुग्ण हीच ईश्वर सेवा' हे ब्रीद वाक्य घेऊन आरोग्य क्षेत्रात उंच भरारी मारणाऱ्या डॉ. दीपक पाटील हे रुग्णांना संजीवनी देणारे व्यक्तिमत्त्व ठरले आहे.

शिक्षण त्यांनी अतिशय खडतर परिस्थितीत पूर्ण केले. डॉ. पाटील यांचे वडील आनंदराव पाटील हे सैन्यात आपले कर्तव्य पार पाडत होते. त्यावेळी त्यांच्यासोबत राहून सैनिकी शिस्तीत आर्मीच्या केंद्रीय शाळेत डॉ. पाटील यांनी शालेय शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण हे श्री वारणा महाविद्यालय येथे केले. एम.बी.बी. एस.चे शिक्षण प्रख्यात कृष्णा मेडिकल कॉलेज, कराड येथे झाले. क्रिटीकल केअरमधील डिप्लोमा हा रुबी हॉल, पुणे येथे झाला.

पन्हाळा-शाहूवाडीच्या डोंगराळ भागात वैद्यकीय सेवेचा अभाव त्यांच्या लक्षात आला. ती गरज लक्षात घेऊन, लोकांची वैद्यकीय सेवेअभावी होणारी होरपळ पाहून त्यांनी पन्हाळा तालुक्यातील बोरपाडळे फाटा येथे 'संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल' ची स्थापना केली. ज्या लोकांना अन्य आत्ययिक अवस्थेत हार्ट अ‍ॅटॅक व सीरियस आजारासाठी, गंभीर आजारांसाठी कोल्हापूरला जाईपर्यंत आपल्या जीवाला मुकावे लागत होते. ते थांबावे यासाठी लावलेले लहानशा संजीवनीचे रोपटे आज बघता बघता विशाल वटवृक्षात रूपांतरित झाले आहे.



सरांनी वैद्यकीय सेवेचे शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून डॉ. दीपक पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजची स्थापना केली. तसेच या भागातील मुलां-मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहून रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी नर्सिंग इन्स्टिट्यूट ही कार्यरत आहे. ज्यामुळे डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानगंगेची उपलब्धता झाली. हे सर्व काम

पुढारी Health Icon awards

करताना त्यांना त्यांच्या कुटुंबीयांची व सहकाऱ्याची खंबीर व मोलाची साथ मिळाली आहे.

रुग्णसेवेबरोबर समाजसेवेचेही वृत्त त्यांनी जोपासले आहे. त्यांनी जिल्हा परिषद शाळेतील मुलांना संगणकीय ज्ञानाचे शिक्षण मिळावे म्हणून संगणक वाटप केले. वारणा महाविद्यालय या ठिकाणी 'सायकल बँक योजना' चालू केली. 'संजीवनी फौंडेशन' च्या माध्यमातून अनेक समाजामुखी कामे केली आहेत. कुपोषित बालकांना दत्तक घेणे. त्यांना पोषण आहार पुरविणे. तीन गरजू रुग्णांच्या मोफत हृदय शस्त्रक्रियादेखील त्यांनी स्वखर्चाने साई कार्डिअ‍ॅक सेंटर येथे केल्या आहेत. सगळ्या वाटचालीत एक गोष्ट प्रकर्षाने नमूद करावीशी वाटते, २०१९ साली जी कोव्हिडची सांसर्गिक लाट आली. त्यावेळी संजीवनी हॉस्पिटलच्या या डॉक्टर दाम्पत्यांनी केलेल्या कार्याची! 'कोरोना' या एकाच शब्दाने सगळीकडे हाहाकार माजविला होता. पहिल्या लाटेत तर वैद्यकीय क्षेत्रातही दहशत होती. त्यावेळी न डगमगता अत्यंत खंबीरपणे व अत्यल्प दरात कोव्हिड डेडिकेटेड हॉस्पिटलची सेवा त्यांनी या भागाला उपलब्ध करून दिली. स्वतः दोघांनाही २४ तास रुग्णसेवेसाठी वाहून घेतले.

तीच दुसऱ्या सांसर्गिक लाटेत तर या रुग्णालयाच्या माध्यमातून सरांनी २००-२५० पेशंटवरती संपूर्ण मोफत उपचार केले. त्यात दोनवेळचे जेवण, काढा, ऑक्सिजन या सर्वांचा अंतर्भाव होता. स्वतःच २४ वैद्यकीय सेवा दिल्याने रुग्णमृत्यूचे प्रमाण हे अत्यल्प होते. वडिलांप्रमाणे देशसेवा करण्याचे त्यांचे स्वप्न हे 'कोव्हिड योद्धा' म्हणून कार्य केल्याने पूर्ण झाले. या सर्व वाटचालीत त्यांना त्यांच्या पूर्ण कुटुंबाची देखील साथ आहे. आई, वडील, पत्नी व मुले यांचा उल्लेख ते सार्थ कौतुकाने करतात. प्रत्येक यशस्वी पुरुषांमागे एका स्त्रीचा हात असतो. ही म्हण डॉ. सौ. स्वाती पाटील यांच्याकडे पाहून खरंच प्रत्ययास येते. सरांच्या कोणत्याही प्रकल्पास कार्यसिद्धीस नेण्याचे उत्तरदायित्व त्या हसतमुखाने व तितक्याच कौशल्याने करतात. वैद्यकीय सेवेद्वारे सामाजिक ऋणही देणे लागतो, या भावनेतून डॉ. दीपक पाटील व मॅडम कार्यरत आहेत. कोरोना काळात एकही दिवस दवाखाना बंद न ठेवता रुग्णांना सवलतीच्या दरात उपचार देण्यासाठी दापत्याने परिश्रम घेतले आहेत. आजच्या काळात पैशापेक्षा रुग्णांचे आशीर्वाद मोठे, असा आशावाद मानून कार्यरत असलेल्या या डॉ. दीपक पाटील डॉ. सौ. स्वाती पाटील यांच्या कार्याला मानाचा सलाम!

My Kolhapur Edition
Jul 15, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in